प्रेस नोट दि. २६/०८/२०२४

# युट्युबवर वाहने चोरी करण्याचे व्हिडीओ पाहुन मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक, ८,९०,०००/-रु.किं. च्या १८ महागडया मोटारसायकल जप्त वाहन चोरीचे एकुण- १६ गुन्हे उघड

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत मोटारसायकल चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा. **मा. पोलीस आयुक्त सो, विनयकुमार चौबे सो,** यांनी सर्व गुन्हे शाखेना मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाय योजना राबवुन मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांना आळा घालणे बाबत व गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

दि. ०९/०८/२०२४ रोजी हिंजवडी पोलीस ठाणे हद्दिमध्ये स्नेहराज अपार्टमेंट, बाणेर-म्हाळुंगे रोड येथे एकाच सोसायटी मधुन एक बुलेट व एक प्लसर मोटारसायकल चोरी झाल्या बाबत हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-९२२/२०२४ भा.न्या.सं.कलम-३०३(२) अन्वये गुन्हा नोंद होता. तेव्हा आम्ही सदरचा गुन्हा उघडकिस आणुन आरोपी अटक करण्यासाठी सदरचा गुन्हा गुन्हे शाखा युनिट-४ कडे वर्ग केला होता.

सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप सावंत यांचे मार्गदर्शनाखालील करत असताना सदर गुन्हा करण्यासाठी आरोपी आले कसे व गुन्हा करुन परत कोणत्या मार्गाने गेले यासाठी सी.सी.टी.व्ही फुटेज पाहण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक मयुरेश साळुंखे, पो.उप.नि. नारायण जाधव, स.पो.उप.नि. संजय गवारे, पोहवा/ प्रविण दळे, तुषार शेटे, मोहम्मद गौस नदाफ, सुरेश जायभाये, पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोविंद चव्हाण यांची तीन पथके तयार केली होती.

तेव्हा सदर आरोपी मोटारसायकल चोरी करुन गेलेल्या मार्गा वरील ७० ते ८० सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याचे फुटेजची पाहणी केली असता. सदर गुन्हा करणारा आरोपी व त्याचा वि.सं.बालक साथिदार यांचे बाबत **पोहवा/ सुरेश जायभाये आणि पोना/वासुदेव मुंढे** यांनी केलेल्या सी.सी.टी.व्ही फुटेजचे पडताळणी वरुन व **पोशि/प्रशांत सैद** यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणा वरुन एका वि.सं.बालकास सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने ताब्यात घेवुन त्याचे कडे कौशल्याने तपास केला असता त्याने व आरोपी नामे **अभिषेक मल्लाप्पा हावळेकर, वय-२१ वर्षे, रा-साई दर्शन कॉलनी, शाहुपुरी, सातारा सद्या रा-मांडेकर यांची रुम, आंबेठाण गार्डन समोर, आंबेठाण, चाकण, ता-खेड, जि-पुणे** याने सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा सदर आरोपीस दाखल गुन्हयात दि. २०/०८/२०२४ रोजी अटक करुन त्याचे कडे कौशल्याने तपास केला असता त्याने दाखल गुन्ह्या व्यतिरिक्त खालील इतर गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन त्याचे कडुन खालील गुन्हयात चोरीस गेलेल्या व इतर दोन अशा एकुण-८,९०,०००/-रु.किं. च्या १८ महागडया मोटारसायकल जप्त करुन वाहन चोरीचे एकुण- १६ गुन्हे उघड उघडकिस आणले आहेत.

**आरोपी नामे अभिषेक हावळेकर याचे कडे केलेल्या तपासात तो सातारा येथुन घरी भांडण झाले म्हणुन घरातुन निघुन आला होता व त्याने युट्युब वरुन गाडी कशी चालु करायची तसेच तिचा हॅन्डल लॉक कसे तोडायचे हे पाहुन तो दुचाकी चोरी करत होता. तसेच तो हायवे लगतच्या गाडया चोरी करत असे जेणे करुन सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यामध्ये तो येणार नाही त्याने पुणे, पिंपरी चिंचवड व सातारा परिसरातुन मोटारसायकल चोरी केल्या आहेत.**

दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मयुरेश साळुंखे, गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी चिंचवड हे करत आहेत.

| | |
|---|---|
| १) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ६३८/२०२४ भादंविक-३७९ | ११) चर्तुश्रृंगी पो.स्टे.गु.र.नं. ४७४/२०२४ भादंविक-३७९ |
| २) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ६६३/२०२४ भादंविक-३७९ | १२) चर्तुश्रृंगी पो.स्टे.गु.र.नं. ५७९/२०२४ भादंविक-३७९ |
| ३) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ६४७/२०२४ भादंविक-३७९ | १३) चर्तुश्रृंगी पो.स्टे.गु.र.नं.६९१/२०२४ बीएनएस-३०३(२) |
| ४) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ९२२/२०२४ बीएनएस-३०३(२) | १४) चंदननगर ३६६/२०२४ बीएनएस-३०३(२) |
| ५) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ७७१/२०२४ भादंविक-३७९ | १५) भारती विद्यापिठ २३८/२०२४ भा.दं.वि.क- ३७९ |
| ६) हिंजवडी पो.स्टे.गु.र.नं. ७२८/२०२४ भादंविक-३७९ | १६) सातारा शहर गु.र.नं. ७०३/२०२४ बीएनएस३०३(२) |
| ७) वाकड पो.स्टे.गु.र.नं. ८६४/२०२४ बीएनएस-३०३(२) | |
| ८) सांगवी पो.स्टे.गु.र.नं. ३४०/२०२४ भादंविक-३७९ | |
| ९) पिंपरी पो.स्टे.गु.र.नं. ७३७/२०२४ बीएनएस-३०३(२) | |
| १०) चिंचवड पो.स्टे.गु.र.नं.१६८/२०२४ भादंविक-३७९ | |

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. विनयकुमार चौबे सो, सह पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, संदिप डोईफोडे, सपोआ, गुन्हे-१ मा. श्री. विशाल हिरे, सपोआ गुन्हे-२ बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप सावंत, पोउपनि मयुरेश साळुंखे, नारायण जाधव, सहा.पो.उप.नि. संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, पोहवा/ प्रविण दळे, तुषार शेटे, मोहम्मद गौस नदाफ, सुरेश जायभाये, रोहिदास आडे, पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, पोशि/ प्रशांत सैद, धनाजी शिंदे, गोविंद चव्हाण, सुखदेव गावंडे, अमर राणे यांनी केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड